**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी मोहिमेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत प्रारंभ.**
2. **शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य महामेळाव्याचा समारोप, ४ दिवसात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.**
3. **वर्गातील शिक्षणासोबतच अनुभवातून मिळणारे ज्ञान वकिलाच्या घडणीत निर्णायक ठरते- न्यायमूर्ती विश्वनाथन यांचे विधी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात प्रतिपादन.**
4. **राष्ट्रीय विज्ञान दिन विविध विद्यार्थी केंद्रित उपक्रमांनी साजरा.**

---

एचपीव्ही लसीकरण

एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी मोहिमेचा प्रारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज राजस्थानात अजमेर इथं झाला. गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं याकरता १४ वर्ष वयाच्या मुलींना ही लस देण्यात येणार आहे. दरवर्षी १ कोटी १५ लाख मुलींना लस देण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे. सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस मोफत दिली जाणार असून हे लसीकरण ऐच्छिक आहे. आज पाच मुलींना लस देण्यात आली, त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. हे लसीकरण महिला सक्षमीकरणातलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.....

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज राजस्थानातल्या १६ हजार ६८० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत सुविधांचं लोकार्पण आणि पायाभरणी झाली. पिण्याचं पाणी, रस्ते, जलसिंचन, उर्जा इत्यादी क्षेत्रातले प्रकल्प त्यात आहेत. युवा रोजगार मेळाव्यात त्यांनी २१ हजार ८०० पेक्षा जास्त युवकांना नियुक्तीपत्रं प्रदान केली. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे कार्यक्रमाला उपस्थित होते.

---

चाचण्या यशस्वी

संरक्षण, संशोधन आणि विकास संघटनेनं आज ओदिशा किनारपट्टीलगत चंडीपूर इथून एकात्मिक चाचणी केंद्रातून अत्यंत कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालीच्या तीन उड्डाण चाचण्या यशस्वी केल्या. विविध वेग, टप्पे आणि उंचीवरून हवाई मार्गाने अचानक उद्‌भवणारे संभाव्य धोके निष्फळ ठरवण्यात या संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीची क्षमता पुन्हा सिद्‌ध करण्याच्या उद्‌देशाने या चाचण्या घेण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या सर्व उड्डाण चाचण्यांदरम्यान वेगाने येणाऱ्या हवाई अडथळ्यांवर क्षेपणास्त्रांनी मात केल्याची माहिती मंत्रालयानं दिली आहे.

---

इराणवर हल्ला

इस्रायलने आज इराणवर हल्ला चढवत देशात आणीबाणी लागू केली आहे, अशी घोषणा इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल कात्झ यांनी केली. इराणची राजधानी तेहरान येथे जोरदार स्फोट होऊन दाट धुराचे लोट उसळल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले असून, हा हल्ला इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्ला अली खमेनी यांच्या कार्यालयाजवळ झाल्याची माहिती आहे. दरम्यान, इस्रायलमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि तेल अवीव येथील भारतीय दूतावास यांनी सतर्कतेच्या सूचना जारी केल्या आहेत. स्थानिक प्रशासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, निवाराकेंद्रांजवळ राहावे आणि पुढील आदेश येईपर्यंत अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत तेल अवीवमधील भारतीय दूतावासाशी त्वरित संपर्क साधण्याचेही नागरिकांना कळविण्यात आले आहे.

---

कापूस खरेदी

राज्यात कापूस खरेदीची मुदत १५ मार्च पर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती सरकारने आज विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. मुदत वाढवण्याचा प्रस्ताव पणन विभागाने केंद्र सरकारकडे पाठवला होता, त्यानुसार केंद्र सरकारने याला परवानगी दिली आहे. प्रति एकर उत्पादकतेच्या आधारे खरेदीची मर्यादा ठरवली

जाणार आहे. यासह हरभरा खरेदी ५ हजार ८८५ रुपये प्रति क्विंटल हमीभावाने उद्यापासून सुरू करण्यात येईल.

---------------------------------------------------

आरोग्य महामेळा

संतनगरी शेगाव येथे आयुष मंत्रालय यांच्या वतीने आयोजित चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य महामेळाव्याचा समारोप शुक्रवार, २८ फेब्रुवारी रोजी विशेष नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराने झाला. मुंबई व इतर ठिकाणांहून आलेल्या नामांकित नेत्रतज्ज्ञांकडून तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे देण्यात आले. २५ फेब्रुवारीपासून श्री गजानन महाराज संस्थान यांच्या विसावा भक्तनिवास परिसरात सुरू असलेल्या या महामेळाव्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

---------------------------------------------------

महाराजस्व अभियान

राज्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाराजवं अभियान घेण्यात येत असून त्यातील टप्पे आणि सेवा याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे ......

---------------------------------------------------

NCMC स्मार्ट कार्ड

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) 'NCMC स्मार्ट कार्ड' उपक्रमाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून, अवघ्या आठवड्यात नोंदणीने १ लाखांचा टप्पा पार केला आहे. ही माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या उपक्रमांतर्गत महिला सन्मान योजनेतील ३७,९२७ महिला आणि अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेतील ३४,९४८ ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी केली आहे. स्मार्ट कार्डमुळे सवलत धारक प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, ८० टक्के नोंदणी पूर्ण होईपर्यंत NCMC स्मार्ट कार्ड सक्तीचे नसल्याचे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे.

---------------------------------------------------

महाराष्ट्र विधी विद्यापीठ

महाराष्ट्र नॅशनल लॉ-युनिव्हर्सिटी, नागपूर इथं आज चौथा दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्या.के.व्ही. विश्वनाथन, न्यायाधीश, उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानावर न्या. अतुल एस. चांदूरकर, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व विद्यापीठाचे कुलपती होते. कुलगुरू प्रा.(डॉ.) विजयेंद्र कुमार यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. या दीक्षांत समारंभात एकूण 213 विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी. पदव्या प्रदान करण्यात आल्या, तसच गुणवंत विद्यार्थ्यांना 25 सुवर्णपदकांनी गौरविण्यात आल. दीक्षांत भाषणात न्या. विश्वनाथन यांनी कायदा क्षेत्रात नैतिकता, स्वधर्म व प्रत्यक्ष अनुभवाचे महत्त्व अधोरेखित केले. वर्गातील शिक्षणासोबतच अनुभवातून मिळणारे ज्ञान वकिलाच्या घडणीत निर्णायक ठरते, कायदा हा माणसांमधून कार्यरत असतो, असे त्यांनी नमूद केले. निष्कर्षांवर घाईने उडी न मारणे, अनिश्चिततेला न घाबरणे आणि स्वतःच्या क्षमतेचा योग्य वापर करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

---------------------------------------------------

सत्कार

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, स्थापना दिनी येत्या सोमवार २ मार्च रोजी मनपा मुख्यालयात भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी पद्मश्री जनार्दनपंत बोथे, सत्यनारायण नुवाल, डॉ.विलास डांगरे यांच्यासह शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या माजी महापौर आणि उपमहापौरांचा सन्मान करण्यात येणार आहे. दोन वेळा महापौरपद भूषविलेले राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही विशेष सत्कार होणार आहे. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी १०.३० वाजता मनपा मुख्यालयात हा सोहळा पार पडणार आहे. “पौर जन हिताय” हे ब्रीद जपत नागपूर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेत ७५ वर्षांची उज्ज्वल परंपरा साजरी करीत आहे.

---------------------------------------------------

आकाश फुंडकर

गिग कामगार आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी केंद्र सरकारनं सामाजिक सुरक्षा संहिता २०२० लागू केल्यानं या कामगारांसाठी राज्य सरकारला स्वतंत्र महामंडळ स्थापन करता येणार नाही, असं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आज महाराष्ट्र विधानसभेत सांगितलं. केंद्र सरकारचे कायदे राज्यात लागू केले जाणार आहेत, त्या अंतर्गत असंघटित कामगारांसाठी विविध तरतुदी केल्या जातील असं ते म्हणाले. मुंबई महानगर प्रदेशातल्या मोठ्या रुग्णालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे असं मंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं. राज्यातल्या चार हजारांहून जास्त रूग्णालयात ही योजना लागू असून यात अडीच हजारहून अधिक शासकीय रुग्णालयं आहेत अशी माहिती बोर्डीकर यांनी दिली.

---------------------------------------------------

राष्ट्रीय विज्ञान दिन’

राष्ट्रीय विज्ञान दिन’ आज देशभरात साजरा होत आहे. नोबेल पुरस्कार विजेते ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी वी रामन यांनी, ‘रामन इफेक्ट’ हा महत्त्वपूर्ण शोध लावला, त्यांच्या कार्याचं स्मरण म्हणून आजचा दिवस ‘विज्ञान दिन’ म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशातले शास्त्रज्ञ आणि संशोधकांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशातल्या युवकांना सक्षम करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचा संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. तर वैज्ञानिकांचे अथक प्रयत्न देशाच्या यशाचा मार्ग अधिक सुकर करतो, अशा शब्दात त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. यवतमाळ मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बालवैज्ञानिकांनी विज्ञान प्रदर्शनी भरवून विविध वैज्ञानिक प्रकल्प आणि नवनवीन प्रयोग सादर केले. स्काय इंटरनॅशनल पब्लिक स्कुल मध्ये आयोजित या विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर प्रमोद यादगिरवार व प्राचार्य सुप्रभा यादगिरवार यांनी केले. विज्ञान प्रदर्शनांत बाल वैज्ञानिकांनी पर्यावरण पूरक तंत्रज्ञान, सौरऊर्जा आणि दैनिक जीवनातील वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रकल्प मांडून वैज्ञानिक दृष्टिकोन दर्शविला. कचरा व्यवस्थापन, नैसर्गिक शेती,

जलशुद्धीकरण, प्रकाशाचे विकिरण, अँटी स्लिप अलार्म या विषयावर छोटे प्रयोग लक्षवेधी ठरले.

---------------------------------------------------